Vishwanathpuram, Ambajogai Road, Latur – 413531. MS, India
Tel.: 02382-227424, 227028
Fax.: 02382-227246, 228939
E-mail: mimsr@mimsr.edu.in
Website: www.mimsr.edu.in

# POLICY DOCUMENT FOR WELFARE MEASURES

## 1. Employees Provident Fund Scheme

All eligible employees are included in Employees Provident Fund Scheme as per the Government norms. Through this scheme, deduction of specific amount from employee's salary and equal contribution from institution is done as per norms. After retirement the employee will be benefited with total deposited amount and can avail pension as per norms. Those employees who have lost their life during COVID-19 pandemic, their families were benefited with additional 7 lakhs from EPF office.

## 2. Additional Travelling Allowance for Differently Abled Employees

Additional travelling allowance is offered to differently abled employees as per the government norms and these employees fulfilling the criteria of disability as per the government norms are given traveling allowance four times more than the other employees.

## 3. Loan Facilities

The needy employees are given loan through Dhanwantari Medical College Cooperative Society Ltd. Latur – a cooperative society of all employees of MIMSR Medical College, Latur. This society takes care of needy employees and provides loan for any financial needs and emergencies of Teaching and Non-Teaching Staff such as Home construction, Education to the Ward, Emergency Health Issues, Marriage purpose, Festival Celebration, etc.

4. **Advance Payments**

In case of emergency, the institute offers the facility to avail payment in advance. The advance payment is given to needy Teaching and Non-Teaching staff in case of any emergency/major medical expenditure and on occasion of various family festival celebrations.

5. **Free Health Services**

Free Health Services are offered to all Teaching and Non-Teaching staff members. In addition, 50% concession in Hospital charges for first degree relatives of staff – Father, Mother, Wife, Children, Brothers and Sisters, is also given.

6. **Facilities for attending conference**

The staff members are offered financial support for attending conferences/workshops. They are also given Special leave to attend conferences.

7. **Leave Policies for Employees**

A structured and well defined leave policy consisting of Causal Leave, Earned Leave, Medical Leave and Special Leave to attend conferences/seminar/training / university examinations and other academic activities. 90 days maternity leave is given.

8. **Rewards for Meritorious Performance**

Felicitation of Teaching and Non-Teaching staff and their wards for their achievement in academic and social life at the time of flag hoisting ceremony on 15th August

## 9. Other facilities offered

i. **Uniforms -** A set of uniform is provided to all the Class IV employees of the institution per year free of cost.

ii. Free Internet facility is made available to all the staff members in the campus.

iii. Bank of India, Branch Kasargaon with ATM facility is available in the Campus.

iv. Organization of Professional and personality development training programmes for Teaching and Non-Teaching Staff

v. Discount on tuition fees to the wards of employees is offered after getting admission to any unit of MAEER Trust.

Co-Ordinator, NAAC
M.I.M.S.R. Medical College, Latur

M.I.M.S.R. Medical College LATUR

Dean
M.I.M.S.R. Medical College,
& Y.C.R. HOSPITAL,
LATUR - 413 531.

## कामगारांचे भविष्य ‘सुरक्षित’ तसेच वर्तमान ‘सुखकर’ करणारा

# कर्मचारी भविष्य निधी (EPF) कायदा 1952

## आणि त्याच्या अंतर्गत येणाऱ्या

## कर्मचारी भविष्य निधि योजना १९५२

**Employees Provident Fund Scheme**

## कर्मचारी बीमा योजना १९७६

**Employees Deposit Linked Insurance Scheme**

## कर्मचारी पेंशन योजना १९९५

**Employees Pension Scheme**

# माहिती पुस्तिका- Information booklet

************************************************************


**कर्मचारी भविष्य निधी संगठन, क्षेत्रीय कार्यालय सोलापूर**

**EPFO Regional office, Solapur**

(कार्यक्षेत्र - सोलापुर, लातूर, उस्मानाबाद)

*श्रम एवं रोजगार मंत्रालय, भारत सरकार Ministry of Labour & Employment, Govt. of India*

१६५-ए, सुरवसे टॉवर्स, सात रस्ता, संगमेश्वर कॉलेज जवळ, सोलापूर – ४१३००१

165-A, Surwase Towers, Saat Rasta, Near Sangameshwar college, Solapur – 413 001.
Telephone-(0217) 2313226, 2313266, 2310052, 2316730, Fax-2319140
Email Id: ro.solapur@epfindia.gov.in

**Whats app Helpline number – 9404912406**

# भारत का संविधान

## उद्देशिका

हम, भारत के लोग, भारत को एक सम्पूर्ण प्रभुत्व संपन्न,
समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकतांत्रिक, गणराज्य
बनाने के लिए तथा अपने समस्त नागरिको को :

सामाजिक, आर्थिक और राजनीतिक – न्याय,
विचार, अभिव्यक्ति, विश्वास, धर्म और उपासना की स्वतंत्रता
प्रतिष्ठा और अवसर की समता;

प्राप्त कराने के लिए तथा उन सब में
व्यक्ति की गरिमा और राष्ट्र की एकता और अखंडता
सुनिश्चित करने वाली बंधुता बढ़ाने के लिए

दृढ़ संकल्प होकर हमारी इस संविधान सभा में आज तारीख
२६ नवम्बर, १९४९ के दिन, एतद्द्वारा इस संविधान को
अंगीकृत, अधिनियमित और आत्मार्पित करते हैं ।

# <u>प्रास्ताविक</u>

या माहिती पुस्तिका च्या माध्यमातून **EPF कायदा १९५२** आणि त्या अंतर्गत असणाऱ्या तीन योजना - **कर्मचारी भविष्य निधी योजना १९५२, कर्मचारी बिमा योजना १९७६ आणि कर्मचारी पेन्शन योजना १९९५** यांच्या तरतुदींची माहिती सोप्या मराठी भाषे मध्ये कामगार / कर्मचारी, संस्था चालक, उद्योजक, कंपनीतील अधिकारी, शासनाच्या विविध विभागातील अधिकारी, सामान्य नागरिक यांच्या पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. EPF कायदा आणि त्या अंतर्गत असणाऱ्या तीन योजनांच्या या द्वारे कामगारांना / कर्मचाऱ्याना आपल्या **<u>अधिकारांची</u>** आणि संस्था चालक, उद्योजक, कंपनीतील अधिकारी यांना आपल्या **<u>जबाबदारीची</u>** स्पष्टपणे जाणीव होणे अपेक्षित आहे.

केंद्र सरकारच्या विधी आणि न्याय मंत्रालयाने दिनांक **२९ सप्टेंबर २०२०** च्या गॅझेट नोटिफिकेशन द्वारे **Code on Social Security 2020** (सामाजिक सुरक्षा संहिता २०२०) प्रसिद्ध केली आहे. या मध्ये श्रम मंत्रालयाच्या अंतर्गत येणारे सामाजिक सुरक्षे संबंधित ९ वेगवेगळे कायद्यांना विलीन करून एकत्रित करण्यात आले आहे ज्या मध्ये EPF Act 1952 / कर्मचारी भविष्य निधी कायदा १९५२ याचा पण समावेश आहे. असे असले तरी या कायद्याच्या आणि योजनांच्या तरतुदी मध्ये फार काही बदल नाही करण्यात आलेत. **Code on Social Security 2020** ची माहिती सुद्धा शेवटी देण्यात आली आहे.

केंद्र शासन, राज्य शासन यांचे सर्व विभाग, शासकीय संस्था यांना सुद्धा त्यांनी कंत्राटी पद्धतीने, ठेकेदारा तर्फे, outsourcing agency द्वारे लावलेल्या कर्मचारी / कामगारांची नोंदणी EPF कायद्याच्या अंतर्गत सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना देखील ही माहिती पुस्तिका उपयोगी ठरणार.

ही माहिती संकलित करतांना आणि मराठीत भाषान्तर करतांना योग्य ती काळजी घेण्यात आली आहे, तरी सुद्धा त्यामध्ये काही विसंगती आढळ्यास मूळ कायदा, मूळ योजनांच्या प्रावधानांना, केंद्र सरकार आणि EPFO च्या दिल्ली मुख्यालयाने जारी केलेल्या आदेशांना, परिपत्रकांनाच प्रमाण मानण्यात यावे. ही माहिती पुस्तिका PDF स्वरूपात पाहिजे असल्यास **ro.solapur@epfindia.gov.in** या वर ई-मेल करावे किंवा **9404912406** या नंबर वर whats app द्वारे कळवावे.

**दिनांक - ०७ फेब्रुवारी २०२१**

**डॉ हेमंत मधुकर तिरपुडे**
**क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त**
**EPFO क्षेत्रीय कार्यालय - सोलापूर**

| No | अनुक्रमणिका | Page |
|---|---|---|
| 1 | EPF कायदा 1952 - इतिहास आणि उगम | 5 |
| 2 | EPF कायदा 1952 - संवैधानिक तरतुद आणि प्रावधान | 7 |
| 3 | EPF कायदा 1952 - थोडक्यात माहिती | 10 |
| 4 | EPF कायद्या अंतर्गत नियोक्ता, संस्था, कंपनी, कंत्राटदार यांच्या जबाबदाऱ्या | 12 |
| 5 | भविष्य निधी (EPF ) योजनेचे फायदे / भविष्य निधी खाते बंद न करण्याचे फायदे | 14 |
| 6 | नौकरीत असताना EPF खात्या मधून विविध गरजांसाठी पैसे काढता येतात | 15 |
| 7 | निष्क्रिय खाते - Inoperative Accounts | 16 |
| 8 | कर्मचारी पेन्शन योजना १९९५ - Employees’ Pension Scheme | 17 |
| 9 | कर्मचारी पेन्शन योजना (EPS) 1995 च्या पेन्शनधारकांसाठी सूचना | 21 |
| 10 | पेन्शनसाठी जन्मतारीख दुरुस्त करण्याची ONLINE प्रक्रिया | 23 |
| 11 | कर्मचारी बिमा योजना १९७६ - Employees Deposit Linked Insurance Scheme | 25 |
| 12 | भविष्य निधी कायद्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी विविध प्रकारचे अर्ज | 27 |
| 13 | UAN युनिव्हर्सल अकाउंट नंबर आणि ऑनलाइन अर्ज | 28 |
| 14 | Online अर्ज / दावे दाखल करण्याचे दोन मार्ग | 30 |
| 15 | EPF च्या रक्मे वर १ जुन २०१५ पासून आयकर (इनकम टॅक्स)लागू | 31 |
| 16 | EPF / भविष्य निधी अंशदान न भरल्यास करण्यात येणारी कारवाही | 32 |
| 17 | कर्मचारी भविष्य निधी कायद्या अंतर्गत गुन्हे व अशा गुन्हयांसाठी असणारी शिक्षेची तरतूद | 35 |

| No | नियोक्त्यांसाठी ऑनलाईन प्रक्रिया<br>ONLINE PROCESS FOR EMPLOYERS | Page no |
|---|---|---|
| 18 | संस्था / कंपनीची EPF कायद्या अंतर्गत ऑनलाईन नोंदणी ची प्रक्रिया Procedure for online registration of establishments | 37 |
| 19 | पूर्वी पासून कायद्या अंतर्गत नोंदणी असलेल्या संस्थासाठी यूनिफाईड पोर्टल वर ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया Registration for Pre-OLRE establishments on Unified portal | 38 |
| 20 | कामगारांची नोंदणी आणि त्यांचे युनिव्हर्सल अकाऊंट नंबर (UAN) काढण्याची प्रक्रिया Registration of workers & generation of UAN (Universal Account Number) | 39 |
| 21 | EPF चे इलेक्ट्रॉनिक चलन कम रिटर्न (ECR) काढण्याची प्रक्रिया Generation of Electronic Challan cum Return (ECR) | 40 |
| | | |
| No | ONLINE PROCESS FOR EMPLOYEES<br>कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाईन प्रक्रिया | Page no |
| 22 | ज्या कर्मचाऱ्यांचा UAN सक्रिय आहे आणि ज्यांच्या जवळ UAN चा पासवर्ड आहे त्यांच्यासाठी मोबाईल नंबर Update करण्याची प्रक्रिया Procedure to update mobile number for members who have activated UAN and password | 41 |
| 23 | ज्या कर्मचाऱ्यांचा UAN सक्रिय आहे परंतु पासवर्ड विसरले त्यांच्यासाठी मोबाईल नंबर Update करण्याची प्रक्रिया Procedure to change mobile number for members who have activated UAN but forgotten password | 42 |
| 24 | ज्या कर्मचाऱ्यांचा UAN सक्रिय आहे आणि मोबाईल जोडला आहे त्यांच्यासाठी पासवर्ड reset करण्याची प्रक्रिया Procedure to reset password where UAN is activated and mobile is linked | 43 |
| 25 | सामाजिक सुरक्षा संहिता २०२० (Social Security code 2020) अंतर्गत EPF कायदा आणि योजनांमध्ये केलेले बदल | 44 |

# 1. EPF कायदा 1952 - इतिहास आणि उगम

**१९२५** साली तत्कालीन ब्रिटिश सरकार ने फक्त **शासकीय** कर्मचाऱ्यांसाठी प्रोविडेंट फंड कायदा सुरु केला होता, तो गैर शासकीय कर्मचाऱ्यांना व इतर प्रायव्हेट उद्योगां मध्ये काम करणाऱ्या कामगारांना, मजुरांना लागू नव्हता. औद्योगिक कामगारांसाठी, श्रमिकांसाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यां मध्ये सुधार करण्यासाठी, त्यांचेही भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणी सामाजिक सुरक्षा संबंधी नवे कायदे बनवण्याची गरज लक्षात घेता विचार मंथन करण्यासाठी **१९४०, १९४१ आणी १९४२** साली तीन कामगार परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या. परंतु या तिन्ही परिषदां मध्ये एक मोठी उणीव होती, ती म्हणजे या परिषदां मध्ये **फक्त सरकारचे प्रतिनिधी** बोलावण्यात आले होते, <u>त्यामध्ये उद्योजकांचे प्रतिनिधी किंवा कामगारांचे प्रतिनिधी यांना बोलावण्यात आले नव्हते.</u>

डॉ बाबासाहेब आंबेडकर १९४२ ते १९४६ दरम्यान व्हाइसरॉय कार्यकारी मंडळामध्ये मजूरमंत्री म्हणून कार्यरत होते, **ऑगस्ट १९४२** ला त्यांनी चौथी कामगार परिषद आयोजित केली होती, या परिषदेची दोन मुख्य वैशिष्ट्य होती - पहिले म्हणजे यामध्ये सरकारच्या प्रतिनिधी सोबतच उद्योगांचे प्रतिनिधी आणी कामगारांचे प्रतिनिधी यांना सुद्धा आमंत्रित करण्यात आले होते आणी दुसरे म्हणजे ह्या **त्रिपक्षीय यंत्रणे** (Tripartite mechanism) च्या परिषदा नियमित स्वरूपात होण्यासाठी स्थायी व्यवस्था करण्यात आली होती. याच परिषदे मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते "औद्योगिक कामगारांच्या कल्याणाचे प्रश्न तोवर सुटू शकत नाहीत जो पर्यंत शासन, उद्योजक आणी कामगार एकमेकांप्रती जबाबदारीचा दृष्टीकोन ठेवणार नाहीत, एकमेकांना सम्मान देणार नाहीत आणी सहमतीच्या भावनेने एकत्र काम करणार नाहीत".

याचा परिणाम असा झाला कि आज औद्योगिक कामगारां संदर्भात जेवढेही राज्याचे वा केंद्रांचे कायदे आहेत त्या सर्वां मध्ये ही **त्रिपक्षीय यंत्रणा** (Tripartite mechanism) दिसून येते. [EPF कायदा, त्या अंतर्गत असणाऱ्या तीन योजना, त्याची अंमलबजावणी, प्रशासकीय नियंत्रण, भविष्य निधीची गुंतवणूक, व्याज दर इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवणारी आणि निर्णय घेणारी सर्वोच यंत्रणा म्हणजे **Central Board of Trustees (CBT)**. ही त्रिपक्षीय यंत्रणा (Tripartite mechanism) आहे ज्या मध्ये शासनाचे अधिकारी (केंद्र आणि राज्य), उद्योजगांचे प्रतिनिधी आणि कामगारांचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो.]

याच वर्षी **१९४३** मध्ये "अंशदायी भविष्य निधी" (Contributory Provident Fund) च्या नियमांचे प्रारूप तयार करण्यात आले, त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर धनबाद, राणीगंज येथील कोळश्याच्या खाणीं मध्ये काम करणाऱ्या कामगारांची जोखमीची परिस्थिती बघण्यासाठी ४०० ते १००० फूट खोल खाणीं मध्ये उतरले आणी पाहणी केली. **१९४४** मध्ये कोळसा खाणीं मध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कामगार कल्याण अध्यादेश Coal Mines Labour Welfare Ordinance जारी करण्यात आला ज्याचे पुढे **१९४८** मध्ये Coal Mines Provident Fund Act मध्ये रूपांतर झाले.

भविष्य निधी कायदा हा सर्वप्रथम कोळसा खाणीं मध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी लागू करण्यात आला, त्याच धर्तीवर इतर उद्योगातील कामगारांसाठी सुद्धा भविष्य निधीची सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी **15 Nov 1951** रोजी Employees Provident Fund Ordinance 1951 हा अध्यादेश जारी करण्यात आला होता. **04 March 1952** रोजी त्याचे रूपांतर Employees Provident Fund Act मध्ये झाले.

या कायद्या अंतर्गत "भविष्य निधी योजना" Employees Provident Fund Scheme ही **01 Nov 1952** ला अमलात आली, त्यामुळे **01 November** हा EPFO स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.

# 2. EPF कायदा 1952 - संवैधानिक तरतुद आणि प्रावधान

भारतीय संविधानाच्या नीती निदेशक तत्वांना (Directive Principles of State Policy) आणी त्या मध्ये नेमके **कलम ४१ (Article 41)** च्या प्रावधानांना कार्यान्वित करण्यासाठी EPF कायदा बनविण्यात आला होता. कलम ४१ हे बेरोजगारी, वृद्धावस्था, आजारपण, अपंगत्व आणी अन्य आवश्यक परिस्थिती मध्ये नागरिकांना आर्थिक साहाय्य पुरवण्याचे निर्देश राज्याला देते.

सुरुवातीला हा कायदा फक्त **सहा** उद्योगांना लागू केला होता, ते सहा उद्योग होते - सिमेंट, सिगारेट, कागद, टेक्सटाईल (कापड), लोखंड व स्टील आणी अभियांत्रिकी उत्पादने. या मध्ये सुद्धा फक्त त्याच कारखान्यांना हा कायदा लागू होता ज्या मध्ये **५० पेक्षा** जास्त कामगार आहेत आणी जे कारखाने **तीन वर्षा** पेक्षा जास्त काळापासून कार्यरत आहेत. या सहा उद्योगातील सर्वच कामगारांना भविष्य निधी योजना लागू नव्हती, ही योजना फक्त त्याच कामगाराना लागू होती ज्यांचे वेतन **३०० रूपये** महिना किंवा त्यापेक्षा कमी होते आणी ज्याची **एक वर्ष** सेवा / नौकरी पूर्ण झाली होती. इतर कामगार या योजनेसाठी पात्र नव्हते. तेव्हा नियोक्ता / कंपनी मालक आणी कामगार दोघांनाही **एक आना दर रुपया** असे अंशदान (contribution) भरावे लागत होते.

सुरवातीला EPF कायद्या अंतर्गत फक्त एकच योजना होती - "भविष्य निधी योजना" EPF Scheme, **१९७१** साली **"कर्मचारी कुटुंब पेन्शन योजना" Employees Family Pension Scheme** ही दुसरी योजना लागू करण्यात आली. या मध्ये सेवे दरम्यान / नौकरी करताना जर कामगाराचा मृत्यु झाला तर त्याच्या पत्नीला / पतीला मासिक पेन्शन देण्याची तरतूद होती **परंतु कामगार जर सेवेतून निवृत्त झाला तर त्याला मासिक पेन्शन देण्याची सोय नव्हती**. अशा कामगाराला एक रकमी लाभ दिला जात होता. या योजने मध्ये, भविष्य निधी योजनेच्या अंशदाना सोबत कामगार, नियोक्ता / कंपनी / संस्था आणि केंद्र शासन यांना प्रत्येकी **१.१६%** (मूळ पगार अधिक महागाई भत्ता वर) या दराने अंशदान करावे लागत होते.

**१९७६** साली **"कर्मचारी बिमा योजना" Employees Deposit Linked Insurance Scheme** लागू झाली. EPF कायद्या अंतर्गत ही तिसरी योजना होती, या मुळे खऱ्या अर्थाने कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबांच्या भवितव्याची सुरक्षा परिपूर्ण झाली. या योजने मध्ये **कामगाराला त्याच्या वेतनातून कोणतेही योगदान करण्याची गरज नव्हती**, नियोक्ता / कंपनी / उद्योजक यांना **०.५ %** आणी केंद्र सरकार यांना **०.२५ %** एवढी रकम कामगारांच्या बिम्या साठी अतिरिक्त भरावी लागत होती. **१९९५** नंतर केंद्र सरकार ने त्यांचे योगदान बंद केले. जो कामगार भविष्य निधी योजनेचा (EPF) चा सदस्य असेल तो बिमा योजनेचा पण सदस्य बनेल अशी तरतूद केली गेली. या योजने अंतर्गत जर कामगाराचा सेवेत / नौकरीत असताना कोणत्याही कारणांनी मृत्यु झाला तर त्याच्या वारसाला PF च्या राशी सोबतच बीमा योजनेची राशी सुद्धा मिळायला सुरुवात झाली, अशा स्थिती मध्ये पत्नीला / पतीला पेन्शन देखील मिळत असे.

आणी अशा प्रकारे कुटूंबातील कमावत्या व्यक्तीचा जर मृत्यु झाला तरी तीनही योजने (भविष्य निधी योजना, कुटुंब पेन्शन योजना आणी बीमा योजना) द्वारे त्यांच्या कुटूंबाला पुढचे जीवन जगण्यासाठी एक भक्कम सोयकरण्यातआली.

**१६/११/१९९५** पासून "कुटूंब पेन्शन योजने" च्या जागी **"कर्मचारी पेन्शन योजना" Employees Pension Scheme 1995** सुरु करण्यात आली ज्या मध्ये १९७१ च्या योजनेमध्ये मिळणाऱ्या फायद्यां सोबत कामगाराला निवृत्ती नंतर मासिक पेन्शनची व्यवस्था करण्यात आली. या योजने मध्ये कामगारांना कोणत्याही प्रकारचे योगदान करण्याची गरज नव्हती, संस्थेच्या / मालकाच्या हिस्श्यातून मोठा हिस्सा पेन्शन फंडा मध्ये वळविण्यात आला.

**१९५२** ला EPF कायदा त्याच उद्योगांना / संस्थांना लागू होता **जे तीन वर्षा पासून कार्यरत आहेत** आणी ज्यांची **कामगार संख्या ५० च्या वर** आहे, **१९६०** पासून हा कायदा त्या उद्योगांना / संस्थांना लागू करण्यात आला ज्यांची कामगार संख्या **२० पेक्षा जास्त आणी ५० च्या कमी आहे**, परंतु असे उद्योग / संस्था पाच वर्षांपासून कार्यरत असण्याची अट होती. **१९८८** पासून कामगार संख्या २० पेक्षा जास्त आणी तीन वर्षा पासून जे उद्योग/संस्था कार्यरत आहेत अश्याना हा कायदा लागू करण्यात आला. **१९९७** पासून तीन वर्ष कार्यरत राहण्याची अट रद्द करण्यात आली आणी **ज्या दिवसा** पासून कामगार संख्या २० झाली त्या दिवसा पासूनच कायदा लागू करण्यात आला.

उद्योगाला / संस्थेला कायदा लागू झाल्यानंतर तो सर्वच कामगारांना लागू होत नव्हता, कायदा कोणत्या प्रकारच्या कामगारांना आणी कधी लागू होणार याचे दोन निकष होते, एक म्हणजे त्याच्या सेवेचा / नौकरीचा कार्यकाळ आणी दुसरे म्हणजे कामगाराचे वेतन. १९५२ मध्ये हाकायदा फक्त त्याच कामगाराना लागू होता ज्यांचे वेतन **३०० रूपये** महिना होते आणी ज्याची **एक वर्ष** सेवा / नौकरी पूर्ण झाली होती. पुढे हे दोन्ही निकष कसे बदलत गेले आणी जास्तीत जास्त कामगारांना याचा फायदा कसा झाला हे पुढील तक्त्या मधून स्पष्ट होणार.

| **कालावधी / वर्ष** | **रुजू झाल्याच्या किती दिवसानंतर कायदा लागू** |
|---|---|
| 1952 ते 1974 | एक वर्षा नंतर |
| 1974 ते 1981 | सहा महिन्या नंतर |
| 1981 ते 1990 | तीन महिन्या नंतर |
| 1990 पासून पूढे | रुजू झाल्या च्या पाहिल्या दिवसा पासून |
| | |

| कालावधी | कायदा लागू होण्यासाठी कामगाराचे वेतन |
|---|---|
| 1952 ते 1957 | 300 पेक्षा कमी |
| 1957 ते 1962 | 500 पेक्षा कमी |
| 1962 ते 1976 | 1000 पेक्षा कमी |
| 1976 ते 1985 | 1600 पेक्षा कमी |
| 1985 ते 1990 | 2500 पेक्षा कमी |
| 1990 ते 1994 | 3500 पेक्षा कमी |
| 1994 ते 2001 | 5000 पेक्षा कमी |
| 2001 ते 2014 | 6500 पेक्षा कमी |
| सप्टेंबर 2014 पासून | 15,000 पेक्षा कमी |

# 3. EPF कायदा 1952 - थोडक्यात माहिती

1) भारतीय संविधानाच्या नीती निदेशक तत्वांना (Directive Principles of State Policy) आणी त्या मध्ये नेमके **कलम ४१ / Article 41** च्या प्रावधानांना कार्यान्वित करण्यासाठी EPF कायदा बनविण्यात आला आहे.

2) **कलम ४१** हे बेरोजगारी, वृद्धावस्था, आजारपण, अपंगत्व आणी अन्य आवश्यक परिस्थिती मध्ये नागरिकांना आर्थिक सहाय्य पुरवण्याचे निर्देश राज्याला देते.

3) EPF कायदा हा **केंद्र शासनाच्या / भारत सरकारच्या** श्रम आणि रोजगार मंत्रालयाचा कायदा आहे (Ministry of Labour & Employment, Government of India)

4) EPF कायद्याची अंमलबजावणी आणि कार्यान्वनची जबाबदारी ही केंद्र शासनातील श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या (Ministry of Labour & Employment, Government of India) अंतर्गत येणाऱ्या **कर्मचारी भविष्य निधि संगठन / EPFO - Employees Provident Fund Organization** ची आहे.

5) कर्मचारी भविष्य निधि संगठन - EPFO ची सर्व राज्यात **135** क्षेत्रीय कार्यालये (Regional offices) आणि **117** जिल्हा कार्यालये (District offices) आहेत.

6) ह्या कायद्या अंतर्गत कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी **तीन योजना** बनविण्यात आल्या आहेत

- कर्मचारी भविष्य निधि योजना १९५२ (Employees Provident Fund Scheme)
- कर्मचारीबीमा योजना १९७६ (Employees Deposit Linked Insurance Scheme)
- कर्मचारी पेंशन योजना १९९५ (Employees Pension Scheme)

7) "कर्मचारी भविष्य निधी योजना" (EPF) ही **१ नवंबर १९५२** ला अमलात आली, त्यामुळे १ नवंबर हा EPFO स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो.

8) EPF कायदा त्या अनुसूचित कारखाने **(Scheduled industries)** आणि अधिसूचित आस्थापना **(Notified establishments) -** उद्योग, कंपन्या, संस्था, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, शाळा, कॉलेजेस, युनिव्हर्सिटी, दुकाने, शोरूम, सिनेमा थिएटर्स, मॉल्स, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, बांधकामक्षेत्र,शासकीय विभागात सेवा देण्यासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार / एजेन्सी, कॉलसेंटर, सर्विस सेंटर इत्यादी याना लागु होतो जिथे कामगारांची संख्या २० किंवा २० पेक्षा जास्त आहे.

9) **२० पेक्षा कमी** कामगार असलेल्या कंपन्या, संस्था, दुकाने, हॉस्पिटल, हॉटेल, कंत्राटदार, उद्योग, व्यवसाय इ. आपल्या कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी भविष्य निधी कायदा कलम **१(४)** नुसार स्वच्छेने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करू शकतात. या साठी कामगार व नियोक्ता यांची संयुक्त लेखी सम्मती आवश्यक असते.

10) EPF कायदा **सर्व प्रकारच्या** कामगारांना लागू होतो - नियमीत कामगार, रोजंदारी कामगार, कंत्राटी कामगार, बदली कामगार, हंगामी कामगार इत्यादी जे कंपनी / संस्थेच्या कामासाठी लावले आहेत आणि ज्यांचे **Basic Pay + DA 15,000** किंवा त्या पेक्षा कमी आहे.

11) EPF कायदा कामगार रुजू होण्याच्या **पहिल्या दिवसा पासूनच** लागू होतो. नौकरीच्या पहिल्या महिन्या पासून कामगारांच्या एकूण वेतन / पगारा मधील - मूळ वेतन, महागाई भत्ता, रिटेनिंग अलाउंस याच्या **12%** रकम भविष्य निधी अंशदानाच्या स्वरुपात कपात केली जाते.

12) कारखाने, उद्योग, कंपन्या, संस्था यांच्या मालकाना, नियोक्ताना सुद्धा **12%** अंशदान (3.67% भविष्य निधी मध्ये आणि 8.33% पेंशन योजने मध्ये) भरावे लागते आणि कर्मचारी बीमा योजने साठी **0.5%** अंशदान भरावे लागते. या व्यतिरिक्त मालकाना, नियोक्ताना **0.5%** प्रशासकीय शुल्क सुद्धा भरावे लागते.

13) कामगाराचे **12%** आणि मालक / नियोक्ता यांचे **13%** असे एकूण **25%** रकमेचे ऑनलाइन चलन **महिन्याच्या १५ तारखे पर्यन्त** भविष्य निधि कार्यालाच्या (EPFO) च्या बैंक खात्या मध्ये जमा करावयाचे असते.

# भविष्य निधी कायद्या अंतर्गत अंशदानाचे दर

# Rates of contributions under EPF Act

| | **कामगार / कर्मचारी Employee / Worker** | **नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार /संस्था Employer / Company / Contractor / Society** | |
|---|---|---|---|
| | अंशदान / वर्गणी Contributions | अंशदान / वर्गणी Contributions | *प्रशासकीय शुल्क Administrative charges* |
| कर्मचारी भविष्य निधी योजना (EPF scheme) | 12 % | 3.67 % | *0.5 %* |
| कर्मचारी पेन्शन योजना (EPS scheme) | NIL | 8.33 % | *NIL* |
| कर्मचारी बिमा योजना (EDLI scheme) | NIL | 0.5 % | *NIL* |
| **एकूण / Total** | **12 %** | **12.5 %** | ***0.5 %*** |
| कामगार / कर्मचारी / Employee / Worker **12 %** | | नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार / Employer / Contractor **13 %** | |

वरील प्रमाणे नियोक्ता / कंपनी / कंत्राटदार / संस्था / Employer / Company / Contractor / Society यांनी स्वतःचे **13%** आणि कामगाराच्या वेतनातून कपात केलेले **12%** एवढी रकम**(एकूण 25%)** इलेक्ट्रॉनिक चलन कम रिटर्न (ECR) द्वारे ऑनलाईन पद्धतीनेच भविष्य निधी कार्यालयाच्या खात्यामध्ये दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत जमा करायचे आहे.

# 4. EPF कायद्या अंतर्गत नियोक्ता / संस्था / कंपनी / मालक / कंत्राटदार यांच्या जबाबदाऱ्या

१. आपली संस्था / कंपनी चे https://www.epfindia.gov.in > Our Services > For Employers > Online registration of establishment वर ऑनलाईन नोंदणी करणे.

२. संस्था / कंपनी मध्ये कर्मचाऱ्यांची संख्या ज्या तारखे पासून २० किंवा २० च्या वर झाली त्या तारखेपासूनच नोंदणी करणे.

३. मालकीचे रिटर्न / रिटर्न ऑफ ओनरशिप **(फॉर्म 5A)** मध्ये स्वतःची माहिती, पद / हुद्दा, पत्ता, ई-मेल, फोन नंबर आणि सर्व शाखांची माहिती देणे. <u>या रिटर्न मध्ये जर Consultant / Agent / Middleman याची माहिती दिल्यास तो गुन्हा ठरतो.</u>

४. ज्या कर्मचाऱ्याचा Basic + DA **१५,०००** पेक्षा कमी आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांना PF नंबर व UAN - Universal Account Number युनिव्हर्सल अकाउंट नंबर देणे.

५. जर कोणता कामगार नवीन लागला आहे तर त्याच्या आधीच्या सेवेची माहिती **फॉर्म नंबर ११** मध्ये भरून घेणे व UAN - युनिव्हर्सल अकाउंट नंबर च्या माध्यमातून त्याची आधीची सेवा (past service) चालू सेवे (present service) मध्ये जोडणे.

६. त्या कामगाराने जर आधी कुठेही नौकरी केली नसल्यास त्याच्या PF नंबर सोबतच UAN - युनिव्हर्सल अकाउंट नंबर काढणे, UAN ला आधार, PAN, बँक अकाउंट सोबत जोडणे व DSC / ESIGN द्वारे अधिकृत करणे.

७. कामगारांना त्यांचा UAN सक्रिय (activate) करण्यासाठी मदत करणे.

८. सर्व पात्र कर्मचाऱ्यांच्या मासिक पगारातून **१२** टक्के अंशदान कपात करणे, स्वतःच्या हिश्याचे **१२.५** टक्के अंशदान व प्रशासकीय शुल्क **०.५** टक्के इलेक्ट्रॉनिक चलन कम रिटर्न (ECR) द्वारे ही २५ टक्के रक्कम भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे.

९. ही देय रकम पुढच्या महिन्याच्या **१५ तारखेच्या** आत भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे. जर ही देय रकम **१५ तारखेनंतर** भरली तर त्यावर **१२ टक्के व्याज** आणि पुढील प्रमाणे **दंड** आकारल्या जातो :-

**० - २ महिने विलम्ब : ०५% दंड**
**२ - ४ महिने विलम्ब : १०% दंड**
**४ - ६ महिने विलम्ब : १५% दंड**
**०६ महिन्या पेक्षा जास्त : २५ % दंड**

१०. **पेन्शन फॉर्म 10D, पेन्शन योजना प्रमाणपत्र फॉर्म 10C, मृत्यु दावा फॉर्म 20, बीमा दावा फॉर्म 5-IF** दाव्यांची तपासणी करणे, योग्य कागदपत्र जोडणे, दाव्यां वर नियमा प्रमाणे हस्ताक्षर करून ते दावे भविष्य निधी कार्यालया मध्ये जमा करणे. भविष्य निधी withdrawal फॉर्म १९, अग्रीम रकम काढण्यासाठी फॉर्म ३१, अकाऊंट ट्रान्सफर करण्यासाठी फॉर्म १३ इत्यादी दावे / अर्ज हे कामगार / कर्मचारी ऑनलाईन प्रणाली द्वारे भरता येतात.

११. संस्था / कंपनी मध्ये **कंत्राटदाराच्या** माध्यमातून जर कामगार लावले असतील आणी कंत्राटदार EPF मध्ये नोंदणीकृत **<u>नसेल</u>** तर अशा कामगारांचा सुद्धा EPF खाते व UAN काढणे, स्वतःच्या कामगारां प्रमाणे त्यांच्या मासिक पगारातून १२ टक्के कपात करणे, स्वतःच्या हिश्याचे १२.५ टक्के व प्रशासकीय शुल्क ०.५ टक्के देणे आणी इलेक्ट्रॉनिक चलान कम रिटर्न (ECR) द्वारे ही रकम भविष्य निधी कार्यालयाच्या खात्या मध्ये जमा करणे **ही कायद्यात्मक जबाबदारी त्या संस्था / कंपनीची Principal Employer या नात्याने बनते.**

१२. कंत्राटदार जर EPF मध्ये नोंदणीकृत **<u>असेल</u>** तर त्याचे बिल मंजूर करण्यापूर्वी त्याने त्याच्या कामगारांचा EPF जमा केला कि नाही हे तपासणे.

१३. कंत्राटदाराची माहीती EPFO च्या **Principal Employer** पोर्टल वर अपलोड करणे.

१४. भविष्य निधी कार्यालयाचे अधिकारी चौकशी / तपासणीसाठी आल्यास त्यांनी मागितलेली माहिती आणी दस्तावेज पुरवणे.

# 5. भविष्य निधी (EPF) योजने चे फायदे / भविष्य निधी खाते बंद न करण्याचे फायदे

१) EPF खाते हे कामगारांच्या व त्याच्या कुटुंबाच्या ***अडचणीच्या वेळी*** आर्थिक मदत पुरवण्यासाठी आहे, हे खाते म्हणजे बँके मधले बचत खाते नव्हे.  सन २०२० मध्ये कोरोना महामारी मुळे झालेल्या सहा महिने lockdown च्या दरम्यान कामगारांना त्यांच्या भविष्य निधी मधली रक्कम त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोगात आली.

२) कामगाराच्या वेतनातून कपात केलेला **१२%** निधी व संस्थेच्या / कंपनीच्या १२% पैकी **३.६७%** निधी (८.३३% निधी पेन्शन खात्या मध्ये जातो) म्हणजे **१२% + ३.६७%** एवढी रकम कामगारांच्या EPF खात्या मध्ये जमा होते.

३) अशा प्रकारे जमा झालेल्या या दोन्ही रकमे वर चक्रवाढ पद्धतीने व्याज दिले जाते, EPF खात्या वरील व्याज हे इतर सरकारी योजनेतील (PPF,नॅशनल सेविंग सर्टिफिकेट, सिनियर सिटीझन सेविंग स्कीम, पोस्ट ऑफिस मंथली इनकम स्कीम) व्याजा पेक्षा **नेहमीच अधिक असते.**

४) नौकरी करताना EPF खात्यातून वेगवेगळ्या **गरजांसाठी** तुम्ही पैसे काढू शकता - घरबांधण्यासाठी, घर विकत घेण्यासाठी, गृहकर्जाची परतफेड करण्यासाठी, आजारपणासाठी, शिक्षणासाठी, लग्नासाठी, कारखाना बंद पडल्याच्या स्थितीमध्ये, अपंगत्व आल्यावर लागणारी उपकरणे विकत घेण्यासाठी, नैसर्गिक आपत्ती जागतिक महामारीच्या वेळी इत्यादी.

५) EPF खात्यातून पुढील स्थिती मध्ये संपूर्ण रकम काढता येते - नौकरीतुन ५५ वर्षे नंतर निवृत्त झाल्यावर, शारीरिक किंवा मानसिक अपंगत्वमुळे निवृत्त झाल्यावर, परदेशात नौकरी करण्यासाठी किंवा कायमचे वास्तव्य करण्यासाठी, एखाद्या महिला कर्मचाऱ्याने स्वतःच्या लग्नासाठी नोकरी सोडली असेल तर, वैयक्तिक किवा सामूहिक रित्या कामगारांची नौकरीतून कपात झाल्यावर.

६) या शिवाय इतर कारणांमुळे जर नौकरी सोडावी लागली आणी दोन महिने बेरोजगार राहून सुद्धा इतर ठिकाणी नौकरी नाही लागल्यास EPF खात्यातून संपूर्ण रकम काढता येते.

७) नोकरीला लागल्या नंतर व भविष्य निधी सभासद झाल्या नंतर कामगाराचा पगार जरी रु.१५०००/- पेक्षा जास्त झाला तरी कामगार भविष्य निधीचा सदस्य कायम राहतो.

## 6. नौकरीत असताना EPF खात्या मधून विविध गरजांसाठी पैसे काढता येतात

| अग्रीम / उचल (Non-refundable Advance) | पात्रता / Eligibility |
|---|---|
| घर / जागा खरेदीसाठी | ५ वर्षे नोकरीव योजनेचे सदस्यत्व |
| राहत्या घराच्या अतिरिक्त बांधकामासाठी | राहते घर बांधून ५ वर्ष पूर्ण |
| बँकेतुन घरासाठी घेतलेले कर्ज परत फेडण्यासाठी | १० वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| सरकार द्वारा घोषित महामारी किंवा वैश्विक महामारीसाठी | सेवे ची अट नाही |
| स्वतःच्या किंवा कुटुंबातील व्यक्तिंच्या खालील आजारपणासाठी<br>- टी बी / क्षय रोग /पॅरालीसिस / कॅन्सर / हृदय रोग / मानसिक रोग<br>- एक महिन्यापेक्षा जास्त दिवस हॉस्पिटल मध्ये भरती<br>- मोठ्या सर्जिकल ऑपेरेशन साठी | सेवे ची अट नाही |
| स्वतःच्या, मुलांच्या, भावाच्या, बहिणीच्या लग्नासाठी | ७ वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| मुलांच्यादहावी नंतरच्या शिक्षणासाठी | ७ वर्ष नोकरी व योजनेचे सदस्यत्व |
| १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस कंपनी बंद पडली असेल किंवा लॉक अप असेल आणि कामगार बेरोजगार होवून त्यांना कोणतिही भरपाई मिळाली नसेल तर | |
| संपा व्यतिरिक्त अन्य कारणामुळे २ महिन्यां पेक्षा जास्त महीनेकामगारांना पगार मिळाला नसेल तर | |
| कामगाराला नौकरीतून काढून टाकले असेल / रिटरेंच केले असेल आणि त्या विरोधात कामगार न्यायालयात गेला असेल तर | |
| सहा महिन्या पेक्षा जास्त दिवस कंपनी बंद पडली असेल किंवा लॉक अप असेल आणि कामगार बेरोजगार होवून त्यांना कोणतिही भरपाई मिळाली नसेल तर | |
| असाधारण आपत्ती / नैसर्गिक आपत्ती जसे पूर किंवा भूकंप किंवा दंगली इत्यादी कारणांमुळे जर कामगाराच्या संपत्तीचे नुकसान झाले असेल तर | |
| अपंगत्व आलेल्या कामगारांना अपंगत्वा साठी साहित्य विकत घ्यावयाचे असेल तर | |

# 7. निष्क्रिय खाते - Inoperative Accounts

जो पर्यंत कर्मचारी नौकरी मध्ये आहे आणि त्याच्या वेतनातून भविष्य निधी कपात होत आहे तो पर्यंत कोणतीही वयाची अट न राहता त्याच्या EPF खात्या मध्ये असलेल्या रकमेवर व्याज देण्यात येते.

**खालील परिस्थिती मध्ये भविष्य निधीची रक्कम देय असलेल्या तारखेपासून पुढील फक्त ३६ महिन्यापर्यंत (तीन वर्षे) EPF खात्यामध्ये व्याज देण्यात येते :-**

१) वयाची ५५ वर्ष पूर्ण झाल्यावर जर कर्मचारी निवृत्त झाला आणि त्याने भविष्य निधी रक्कम काढण्यासाठी पुढील ३६ महिने दावा दाखल केला नाही तर.

२) जर कर्मचारी कायमस्वरूपी परदेशात गेला आणि त्याने भविष्य निधी रक्कम काढण्यासाठी पुढील ३६ महिने दावा दाखल केला नाही तर.

३) जर कर्मचाऱ्याचा मृत्यु झाला आणि त्याच्या परिवारातील सदस्यांनी भविष्य निधी रक्कम काढण्यासाठी पुढील ३६ महिने दावा दाखल केला नाही तर.

४) भविष्य निधी खाते बंद झाले आहे आणि त्यानंतर जर कंपनी / संस्था / आस्थापना ने रजेचा पगार अथवा मागील बाकी वेतन दिले असेल व त्यावरील कपात केलेला भविष्य निधी संबंधित खात्या मध्ये जमा केला असेल व हि रक्कम काढण्यासाठी पुढील ३६ महिने दावा दाखल केला नाही तर.

५) भविष्य निधी खाते बंद झाले आहे आणि त्यानंतर सदर खात्या मध्ये मागील देय अंशदान जमा झाले असेल व सदर जमा रक्कम सदस्याचा सध्याचा पत्ता उपलब्ध नसलेमुळे त्या कर्मचाऱ्याला दिली गेली नसेल तर.

## 8. कर्मचारी पेन्शन योजना १९९५ - Employees Pension Scheme 1995

**१)** या योजनेचे सदस्य बनण्यासाठी कामगारांना त्यांच्या पगारातून कोणतीही वर्गणी/ अंशदान द्यायची गरज नाही. जेव्हा कामगार भविष्य निधी योजनेचा सदस्य बनतो तेव्हा तो आपोआपच पेन्शन योजनेचा सुद्धा सदस्य बनतो.

**२)** कंपनी / संस्थेच्या १२% अंशदानपैकी ८.३३% निधी कामगाराच्या <u>**पेन्शन**</u> खात्या मध्ये जातो आणि ३.६७% कामगाराच्या **EPF** खात्या मध्ये जातो. कंपनी / संस्थे नी हा ८.३३% निधी <u>**नाही भरला तरी देखील**</u> कामगाराना सर्व प्रकारच्या **पेन्शनचे लाभ व सुरक्षा देण्याची हमी** EPF कायद्या मध्ये आहे.

**३) पात्र सेवा (Eligible service) -** हा कामगाराच्या / कर्मचाऱ्याच्या सेवेचा असा कालावधी आहे ज्यामध्ये कर्मचारी पेन्शन योजना १९९५ च्या अंतर्गत अंशदान (pension contribution) प्राप्त झाले असेल किंवा प्राप्त होण्यास योग्य असेल. जे कामगार **हंगामी** व्यवसाय, उद्योगा मध्ये कार्यरत आहेत ज्यामध्ये वर्षाचे काहीच महिने काम असते, जसे ५ ते ७ महिने, आणि या ५ ते ७ महिन्याच्या कालावधी मध्ये त्यांचे पेन्शन अंशदान जमा झाले असेल तर या कालावधीला पेंशन पात्रते साठी **संपूर्ण वर्ष** गणले जाते.

**४)** नौकरीची **१० / २० वर्ष** सेवा केल्यावर कामगार मासिक पेन्शनसाठी पात्र ठरतो, वयाच्या **५०** वर्षानंतर <u>कमी दराने</u> पेन्शन दिली जाते आणी **५८** वर्षानंतर पूर्ण दराने पेन्शन दिली जाते.

**५)** पेन्शन गणना करताना कामगाराच्या शेवटच्या वेतन पासून मागील ६० महिन्याचे वेतन विचारात घेतल्या जाते. त्याची सरासरी ही **पेन्शनेबल सॅलरी** म्हणून ग्राह्य धरली जाते. पेन्शन गणना करताना सदस्याचा पगार हा जास्तीत जास्त **रु१५०००/-** विचारात घेतला जातो.

**६) कामगाराला / कर्मचाऱ्याला <u>स्वतःला</u> मिळणाऱ्या विविध मासिक पेन्शनचे प्रकार**

a. **अधिवर्षीता पेन्शन / Superannuation Pension** - 20 वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झाल्या नंतर आणि वयाची 58 वर्षे पूर्ण <u>झाल्या नंतर</u> “अधिवर्षीता पेन्शन” मिळते.

b. **निवृत्ती पेन्शन / Retirement Pension** - 20 वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झाल्या नंतर आणि 58 वर्षे पूर्ण होण्या <u>अगोदर</u> सेवानिवृत्ती झाली तर “निवृत्ती पेन्शन” मिळते.

c. **कमी कालावधीची सेवा पेन्शन / Short Service Pension** - 10 वर्षे व त्यापेक्षा जास्त परंतु 20 वर्षांपेक्षा कमी सेवा आणि वय 50 वर्षे झाल्यावर ही पेन्शन मिळते.

d. **अपंग सदस्य पेन्शन / Disabled Member Pension** - जर कर्मचारी / कामगार कायमस्वरूपीशारीरिक व मानसिक अपंगत्वामुळे सेवानिवृत्ती घेत असेल तर खालील अटींवर अपंगत्व पेन्शन मंजूर होते.

1. अपंगत्व 1/4/1993 नंतर आले असावे.
2. अपंगत्व कामा / सेवा दरम्यान असणे आवश्यक.
3. सेवा समाप्ती / सेवानिवृत्ती चे कारण अपंगत्वामुळे असावे आणि पेन्शन फॉर्म नंबर 10 मध्ये तसा उल्लेख असावा.
4. पेन्शन अंशदान कमीत कमी एक महिन्याचे जमा असावे.

**७) कामगाराच्या / कर्मचाऱ्याच्या परीवाराला मिळणाऱ्या विविध मासिक पेन्शन चे प्रकार**

a. **विधवा / विधुर पेन्शन (Widow pension) -** पेन्शनरच्या मृत्यू नंतर त्याच्या **पत्नीला / पतीला** मासिक पेन्शन दिली जाते व **दोन मुलांना** २५ वर्षे होई पर्यंत पेन्शन मिळते.

b. **विधवा / विधुर पेन्शन (Widow pension) -** कामगाराचा **नौकरी दरम्यान** मृत्यू झाला आणि पेन्शन चे खाते सुरु असल्यास त्याच्या **पत्नीला / पतीला** मासिक पेन्शन दिली जाते व **दोन मुलांना** २५ वर्षे होई पर्यंत पेन्शन मिळते.

c. **विधवा / विधुर पेन्शन (Widow pension) -** कामगाराने १० वर्षे पूर्ण होण्याच्या **आधी** नोकरी सोडली आणि त्याचा मृत्यू वयाची ५८ वर्ष पूर्ण होण्याचा **आधी** झाल्यास, अशा परिस्थिती मध्ये नोकरी सोडण्याची तारीख व मृत्यू दिनांक यात **३६** महिन्या पेक्षा **कमी** कालावधी असेल तर त्याच्या / तिच्या **पती / पत्नीस** पेन्शन लागू होते तसेच **मुलांना** सुद्धा पेन्शन चालू होते. परंतु नोकरी सोडण्याची तारीख व मृत्यु दिनांक यातील कालावधि जर ३६ महिन्यापेक्षा **जास्त** असेल तर पेन्शन लागू होत नाही, अशा स्थिति मध्ये लमसम पेन्शनची रक्कम दिली जाते.

d. **पालक पेन्शन (Dependent Parent Pension) -** कामगार अविवाहित असल्यास आणि कामगाराचा नौकरी दरम्यान मृत्यू झाला व पेन्शनचे खाते सुरु असल्यास कामगाराच्या / कर्मचाऱ्याच्या **वडिल / आई ना** जे त्यावर अवलंबून आहेत, मासिक पेन्शन दिली जाते.

e. **अपंग मूल पेन्शन (Disabled Child Pension) -** कामगाराचा मुलगा /मुलगी शारीरिक किंवा मानसिक दृष्ट्या अपंग किंवा विकलांग (Disabled) असल्यास पेन्शन फॉर्म भरताना याचा स्पष्ट उल्लेख करावा व सोबत मेडिकलबोर्ड चेप्रमाणपत्र जोडावे. अशा मुलांना **आजीवन** म्हणजेच त्यांच्या मृत्यू पर्यन्त पेन्शन दिल्या जाते.

f. **अनाथ पेन्शन (Orphan Pension) -** कामगाराचा / कर्मचाऱ्याचा आणि त्याच्या / तिच्या **पती/ पत्नी** दोघांचाही मृत्यु झाल्यास, त्यांच्या परिवारातील २५ वर्षाच्या आतील पहिल्या दोन मुला, मुलींना अनाथ पेन्शन दिल्या जाते. अनाथ पेन्शन मुलांना वयाच्या २५ वर्षा पर्यंत मिळते. एकावेळी जास्तीत जास्त दोन मुलांना अनाथ पेन्शन दिल्या जाते.

कुटुंबामध्ये दोन पेक्षा जास्त मुले २५ वर्षापेक्षा कमी असतील तर त्यातील पहिल्या दोन मुलांना २५ वर्षा पर्यंत अनाथ पेन्शन मिळते, त्यानंतर जसा क्रम असेल त्याप्रमाणे पुढील मुलांना त्यांच्या वयाच्या २५ वर्षा पर्यंत पेन्शन मिळते. अनाथ पेन्शन ही विधवा पेन्शनच्या ७५% इतकी असते. अनाथ पेन्शन कमीत कमी ₹२५० एवढी असते.

g. **वारस पेन्शन (Nominee Pension) -** कामगार / कर्मचारी सभासद अविवाहित असल्यास **किंवा** पती / पत्नी नसल्यास **किंवा** पेन्शन पात्र मुलें नसल्यास त्याच्या मृत्यु पश्चात वारस पेन्शन मिळण्यासाठी वारस अर्जामध्ये (Nomination form) वारसांची नोंद करणे आवश्यक आहे.

कालांतराने सभासद विवाहित झाल्यास व त्याचे कुटुंब झाले तर वारस अर्जामधील वारस नोंद रद्दबातल होते व हा वारस पेन्शनचा फायदा वारसाला मिळू शकत नाही, म्हणजे सभासदाचा मृत्यू विवाहित होण्यापूर्वी झाला तरच सदर वारस पेन्शनचा फायदा मिळू शकतो. वारस पेन्शनचा दर हा विधवा पेंशन दराप्रमाणे निश्चित केला जातो.

**८)** दिनांक २६/०९/२००८ पासून “भांडवल परतावा” **(Return of Capital)** व पेन्शन विक्री **(Commutation of pension)** हे दोन्ही विकल्प बंद करण्यात आलेले आहेत, “भांडवल परताव्या” (Return of Capital) विकल्प मध्ये दिलेल्या ROC नॉमिनी (Nominee) चे जर पेन्शनरच्या आधी निधन झाले तर पेंशनधारकानी दुसऱ्या व्यक्ती चे नाव ROC नॉमिनी (Nominee) म्हणून देण्याची कारवाई स्वतच्या हयातीतच करावी.

**९)** “पेन्शन विक्री” (Commutation of pension) चा विकल्प ज्या पेंशनधारकानी दिलेला आहे अशा सर्व पेंशनधारकाना लमसम रकम दिली जाते आणि त्याच्या मोबदल्यात **१५ वर्षा** पर्यंत <u>कमी दराने</u> पेन्शन दिली जाते. १५ वर्ष पूर्ण झाल्या नंतर **मूळ पेन्शन** सुरु करण्यात येते.

**१०)** दिनांक **०१/०९/२०१४** पासून ज्या पेन्शनधारकांनी वयाची **५८ वर्षे पूर्ण** केल्यावर पेन्शनचा फॉर्म भरलेला आहे त्यांना कमीत कमी **रु. १०००/-** पेन्शन लागू करण्यात आली आहे. ज्यांची पेन्शन दि. **२६/०९/२००८** च्या आधी चालू झालेली असेल आणि त्यांनी अर्ज करताना भांडवल परतावा (RoC - Return of Capital) व पेन्शन विक्री (Commutation) यापैकी एक किंवा दोन्ही विकल्प निवडले असतील तर अशा पेन्शनधारकांना हा लाभ मिळणार **नाही.**

**११)** ज्या पेन्शनरची सेवा (service) २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त झालेली आहे आणि ज्यांनी कमी दाराने (Reduced Pension) घेतलेली आहे व त्यांची सेवा दि. २३/०७/२००९ किंवा त्या आधी समाप्त झालेली आहे अशा सर्व पेन्शनरना त्यांची एकूण सेवा **+ २वर्ष (बोनस)** weightage चा लाभ देण्यात येतो.

दिनांक २४/०७/२००९ पासून मात्र ज्यांनी <u>**वयाची ५८ वर्ष पूर्ण केल्यावरच**</u> अर्ज केलेला आहे व २० वर्ष किंवा जास्त सेवा केलेली असेल अशानाच हा २ वर्षाचा लाभ देण्यात येईल. ज्यांनी कमी दराने (Reduced Pension) पेन्शन घेतलेली आहे अशा पेन्शनरना याचा लाभ मिळणार नाही.

**१२)** १० वर्षा पेक्षा <u>कमी</u> काळ नौकरी केली असल्यास व ५० वर्षाची आयु झाली <u>नसल्यास</u> पेन्शनची रकम काढू नये, तसे केल्यास पेन्शन खाते बंद होते. त्या ऐवजी पेन्शन चे **योजनाप्रमाणपत्र** (Scheme certificate) काढावे जेणे करून ही पेन्शन सेवा पुढच्या सेवे मध्ये जोडली जाऊन कामगार वत्याचे कुटुंब भविष्या मध्ये मासिक पेन्शन साठी पात्र ठरते.

## <u>EPS 1995 अंतर्गत पेन्शन वितरण करणाऱ्या बँका</u>

EPFO क्षेत्रीय कार्यालय सोलापूरच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या पाच जिल्ह्यांमध्ये (सोलापूर, लातूर, उस्मानाबाद) खालील राष्ट्रीयकृत बँकांना EPS १९९५ अंतर्गत पेन्शन वितरित करण्यासाठी प्राधिकृत केलेले आहे :-

1. State Bank of India
2. Bank of India
3. Bank of Maharashtra
4. Punjab National Bank
5. Axis Bank

सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, सांगली, सातारा या जिल्ह्यांमधून जर पेन्शन पाहिजे असेल तर वरील पैकी कोणत्याही बँकेत पेन्शनरला आपले बँक अकाउंट उघडणे अनिवार्य आहे. अन्य बँक द्वारे EPS 1995 अंतर्गत पेन्शन वितरित केल्या जात नाही.

## 9. कर्मचारी पेन्शन योजना (EPS) 1995 च्या पेन्शनधारकांसाठी सूचना

**1)** पेंशन सुरु राहण्यासाठी मासिक पेंशन सुरु झाल्या नंतर **प्रत्येक नोव्हेंबर** महिन्यामध्ये सर्व पेंशनधारकाना आपले **जीवन प्रमाणपत्र / हयातीचा दाखला** (लाइफ सर्टिफिकेट) ची **"डिजिटल पद्धतीने"** ने नोंदणी करावी लागते.

**2)** जीवनप्रमाणपत्र नोंदणीची प्रक्रिया हि संपूर्ण वर्षभर सुरु राहते, त्यामुळे पेन्शन धारकांनी नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात भविष्य निधी कार्यालया मध्ये गर्दी करू नये.

**3)** दर वर्षी जीवन प्रमाणपत्राची डिजिटल नोंदणी करण्यासाठी पेन्शनधारकांना भविष्य निधी कार्यालय मध्ये जाण्याची आवश्यकता नाही, आपण खालील ठिकाणी जाऊन नोंदणी करू शकता :-

- आपल्या जवळच्या आपले सरकार सेवा केन्द्र / कॉमन सर्विस सेंटर /ईसेवा, महा ईसेवा केंद्रामध्ये.
- ज्या बँकेत पेन्शन जमा होते त्या बँकेत.
- आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिस मध्ये. (शुल्क रुपये 70)
- आपल्या घरी बसूनच जीवन प्रमाणपत्राची डिजिटल नोंदणी करायची असेल तर **इंडियन पोस्ट पेमेंट बँक** द्वारे आपण पोस्टमन / डाक सेवक ला आपल्या घरी बोलावू शकता. त्यासाठी या संकेत स्थळावर भेट द्या http://ccc.cept.gov.in/covid/request.aspx (शुल्क रुपये 70).

**४)** जीवन प्रमाणपत्रची डिजिटल नोंदणी करण्यासाठी पेन्शनर स्वतः हजर पाहिजे, त्याने सोबत चार बाबी न्यायच्या आहेत - मोबाईल, आधार कार्ड, ज्या बँकेत पेन्शन जमा होते त्या बँकेचे पासबुक आणी पेन्शन आर्डर नंबर. (PPO No).

**५)** डिजिटल नोंदणी करताना आपण **EPS १९९५ / कर्मचारी पेन्शन योजना १९९५** चे पेन्शनर आहोत आणि आपली पेंशन **EPFO** नी मंजूर केलेली आहे हे सांगणे गरजेचे आहे.

**६) सोलापूर** भविष्य निधी कार्यालयाने जारी केलेल्या पेंशन आर्डर नंबरची सुरुवात **PUSLP** नी होते, त्यानंतर आठ आकड़े असतात जसे - **PUSLP 00012345**, पेंशन आर्डर नंबरची डिजिटल नोंदणी याच क्रमानी करणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धती ने नोंदणी झाली तर पेन्शन सुरु होणार नाही.

**७)** डिजिटल नोंदणी करण्यासाठी पेन्शनरच्या बोटांचे ठसे / डोळ्यांचा स्कॅन केला जातो आणि त्या सोबत आधार कार्ड लिंक केला जातो. जर कोणत्या पेन्शनरच्या बोटांचे ठसे / डोळ्यांचा स्कॅन होत नसेल तर

असे पेन्शनर एका लेखी अर्जा मधे तसे नमूद करून आपला PPO नंबर, आधार कार्ड, बैंक पासबुक जोडून भविष्य निधी कार्यालय सोलापूर मध्ये जमा करू शकतात.

**८)** जर कोणता पेन्शनर विकलांग असेल, चालता येत नसेल, तब्येत खराब असल्यामुळे किंवा अशक्तपणामुळे जीवन प्रमाणपत्राची / लाइफ सर्टिफिकेटची डिजिटल नोंदणी करण्यासाठी प्रत्यक्ष जाऊ नसेल शकत तर त्याने / त्यांच्या कुटुंबीयांनी तसे एका लेखी अर्जा मधे नमूद करून, सोबत वैद्यकीय कागदपत्रे जोडून, आपला PPO नंबर, आधार कार्ड, बैंक पासबुक सोबत भविष्य निधी कार्यालया मध्ये जमा करावे.

**टीप - जीवन प्रमाणपत्राची डिजिटल नोंदणी करण्याची व्यवस्था सर्व भविष्य निधि कार्यालयात केलेली आहे.**

## 10. पेन्शनसाठी जन्मतारीख दुरुस्त करण्याची ONLINE प्रक्रिया

जेव्हा भविष्य निधी कायदा कोणत्याही संस्थेला / कंपनीला लागू होतो तेव्हा त्यांचे कर्मचारी / कामगार यांच्या संदर्भात संपूर्ण माहिती - पूर्ण नाव, रुजू दिनांक, जन्मतारीख / वय इत्यादी भविष्य निधी कार्यालयाला त्या संस्थे / कंपनी कडून पुरविली जाते. जर दिलेली माहिती चुकीची असेल तर कर्मचारी / कामगाराना त्यांच्या EPF खात्यातून पैसे काढणे, पेन्शन मंजूर करून घेणे कठीण होते. अशा वेळेस कार्यलयाला बरोबर असलेली माहिती योग्य त्या कागदपत्रांसोबत देणे गरजेचे राहते.

Employees Pension Scheme १९९५ योजने मध्ये पेन्शनच्या पात्रते साठी आणि अचूक पेन्शनच्या गणनेसाठी जन्मतारीख फार महत्त्वाची ठरते, बऱ्याच कर्मचारी / कामगारांची जन्मतारीख भविष्य निधी कार्यालयाला चुकीची कळविण्यात आली असते. अशा वेळेस चुकीच्या जन्मतारखेची दुरुस्ती करण्यासाठी आणि बरोबर असलेल्या जन्मतारखेची नोंद करून घेण्यासाठी भविष्य निधी कार्यालयाच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनांवर आधारित खालील प्रक्रिया निर्धारित करण्यात आली आहे

**1)** भविष्य निधी कार्यालयात नोंदविलेल्या जन्म तारखे मध्ये जर **तीन वर्षा पेक्षा "कमी"** फरक असेल तर पहिले जन्मतारखेची दुरुस्ती कंपनी / संस्थेच्या रेकॉर्ड मध्ये करून घ्यावी आणि त्या नंतर जन्म तारीख दुरुस्त करण्यासाठी कंपनी / संस्था आणि कामगार यांच्या सहीचे **संयुक्त विनंती अर्ज (Joint request)** आणि सोबत आधार कार्डची प्रत कंपनी / संस्थे ने **ONLINE** जमा करावी लागते.

**2)** भविष्य निधी कार्यालयात नोंदविलेल्या जन्म तारखे मध्ये जर **तीन वर्षा पेक्षा "जास्त"** फरक असेल तर पहिले जन्मतारखे ची दुरुस्ती कंपनी / संस्थेच्या रेकॉर्ड मध्ये करून घ्यावी आणि त्या नंतर जन्म तारीख दुरुस्त करण्यासाठी कंपनी / संस्थे ने खालील कागदपत्रे **ONLINE** जमा करावी :-

- कंपनी / संस्था आणि कामगार यांच्या सहीचे संयुक्त विनंती अर्ज (Joint request).
- आधार कार्ड ची प्रत ज्या मध्ये संपूर्ण जन्म तारीख नमूद आहे. (जसे दिनांक / महिना / वर्ष)
- कोणताही एक पुरावा : जन्म दाखला, शाळेचा / कॉलेजचा दाखला, मॅट्रिकुलेशन सर्टिफिकेट / SSC बोर्ड सर्टिफिकेट, ESIC कार्ड, पॅन कार्ड, ड्रायविंग लाईसेन्स, पासपोर्ट, LIC पोलिसी, सरकारी कार्यालयाने जारी केलेले ओळखपत्र.
- कंपनी / संस्था ने दिलेले ओळखपत्र, जॉब कार्ड, वेतन पर्ची (पे स्लिप) ज्यावर जन्मतारीख नमूद केली असेल तर त्याची प्रत.जर कंपनी / संस्था कर्मचाऱ्यांचे कोणतेही सर्विस रेकॉर्ड, माहिती पुस्तिका ठेवत

नसेल तर कंपनी / संस्थेने तसे त्यांच्या कार्यालयीन लेटर हेड वर लेखी कळवावे.

**3)** जन्म तारखेचा पुरावा हा कंपनी / संस्था / अधिकारी / लोक प्रतिनिधी यांनी सत्यापित (अट्टेस्टेड) केला असला पाहिजे. भविष्य निधी कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी किंवा काउंटर वर बसलेले अधिकारी यांना जन्म तारखेच्या पुराव्याची मूळ प्रत (ओरिजिनल) दाखवून कामगार ते सत्यापित (अट्टेस्टेड) करून घेऊ शकतात. **संयुक्त विनंती अर्ज (Joint request) हा भविष्य निधी कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्या मध्येच दिला पाहिजे. कंसलटेंट / एजन्ट / मध्यस्थ यांनी तयार केलेला संयुक्त विनंती अर्ज (Joint request) स्वीकारला जाणार नाही.**

**4)** ज्या अशिक्षित कामगारांकडे जन्मतारखेचा कोणताच पुरावा नाही, त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक (सिविल सर्जन) द्वारे आपली वैद्यकीय तपासणी करून घ्यावी आणि त्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर जिल्हा न्यायालयाकडे (Judicial Magistrate) जन्मतारखेच्या संदर्भात आदेश मिळवून घ्यावा. जिल्हा न्यायालयाचा असा आदेश जन्मतारखे मध्ये दुरुस्ती करण्यासाठी ग्राह्य धरल्या जातो.

## 11. कर्मचारी बिमा योजना 1976 - Employees Deposit Linked Insurance Scheme

१) या योजनेचे सदस्य बनण्यासाठी कामगारांना त्यांच्या पगारातून कोणतीही वर्गणी / अंशदान द्यायची गरज नाही. जेव्हा कामगार भविष्य निधी योजनेचा सदस्य बनतो तेव्हा तो आपोआपच बिमा योजनेचा सुद्धा सदस्य बनतो.

२) कर्मचारी / कामगाराचा **सेवेत असताना, नौकरीच्या दरम्यान, नौकरी / सेवा सोडायच्या आधी** कोणत्याही कारणामुळे मृत्यु / निधन झाल्यास त्याच्या नॉमिनी / खालील परिवारातील सदस्यांना बिम्याचे संरक्षण रकम समान हिश्श्यांमध्ये दिली जाते :-

- पत्नी / पतीला
- अठरा वर्षा खालील मुलगा, मुलगी
- कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेले आई, वडील

**परिवारातील वरील सदस्य हयात नसले तरच** खालील सदस्य बिम्याची संरक्षण रकम मिळण्यासाठी पात्र राहतील :

- अठरा वर्षा वरील पुत्र.
- विवाहित मुली.

३) कर्मचारी / कामगाराचा मृत्यु / निधन जर सेवा / नौकरी सोडल्यानंतर, सेवा संपुष्टात आल्यानंतर, राजीनामा दिल्या नंतर,  सेवा / नौकरीतुन काढल्या नंतर झाल्यास हा बिमा संरक्षण लाभ नॉमिनी / परिवारातील सदस्यांना **दिल्या जात नाही.**

४) बिमा संरक्षण लाभ मिळण्यासाठी **पॉईंट नंबर २ मध्ये** दिल्या प्रमाणे परिवारातील सर्व पात्र लाभार्थी च्या नावानी वेगवेगळे फॉर्म **5IF** दाखल करायला हवे आणी सोबत खालील कागदपत्र जोडावी :-

अ. ओरिजिनल मृत्यू प्रमाणपत्र.

ब. संस्था / कंपनी / नियोक्ता चे कामगार / कर्मचारी **सेवेत असताना** मृत्यू झाल्याचे प्रमाणपत्र.

क. संस्था / कंपनी / नियोक्ता द्वारे दिलेले **परिवारातील सदस्यांचे प्रमाणपत्र.**

संस्था / कंपनी / नियोक्ता ने असे प्रमाणपत्र देण्यापूर्वी कामगाराच्या परिवारामध्ये कोणते आणि किती सदस्य आहेत जसे पत्नी / पतीला, कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेले आई वडील, अठरा वर्षा खालील मुलगा / मुलगी, लग्न झालेली मुलगा / मुलगी इत्यादी हे सुनिश्चित करायचे आहे.

ड. सर्व पात्र लाभार्थ्यांची बँक पास बुकची सत्य प्रत.

५) बिमा संरक्षण लाभाची गणना खालील प्रकारे केल्या जाते :-

**कामगाराच्या निधना पूर्वी 12 महिन्याचे वेतन / पगाराची सरासरी रक्कम X 30**

**+**

**भविष्य निधी खात्यामधली सरासरी 50 % रक्कम**

# 12. भविष्य निधी कायद्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी विविध प्रकारचे अर्ज

| पुढील पाच दावे ऑनलाइन स्वरूपात स्वीकारण्यात येतात | |
|---|---|
| **फॉर्म १९** | सेवा निवृत्त झाल्यानंतर / नौकरी सोडल्यानंतर भविष्य निधी खाते बंद करून संपूर्ण निधी काढण्यासाठीचा अर्ज. |
| **फॉर्म 31** | नौकरी मध्ये कार्यरत असताना भविष्य निधी खात्या मधून विविध कामांसाठी / गरजांसाठी ऍडव्हान्स, अग्रीम काढण्यासाठीचा अर्ज. |
| **फॉर्म 10(C)** | नौकरी सोडल्यानंतर पेन्शन खाते बंद करून पेन्शन निधी (Withdrawal benefit) मिळविण्यासाठीचा अर्ज. (सहा महिन्या पेक्षा जास्त आणि १० वर्षा पेक्षा कमी काळ नौकरी केली असल्यास) |
| **फॉर्म 13** | भविष्य निधी ची रकम आणि सेवा एका खात्या मधून दुसऱ्या खात्या मध्ये ट्रान्सफर करण्यासाठीचा अर्ज. (नौकरी / कंपनी बदल्यानंतर) |
| **फॉर्म 10(D)** | 1) १० / २० वर्ष सेवा/नौकरी आणि वयाचे ५०/५८ वर्ष पूर्ण केल्यानंतर, सेवा निवृत्त झाल्यानंतर /नौकरी सोडल्यानंतर मासिक पेन्शन मिळण्यासाठीचा अर्ज.<br>2) सेवा / नौकरी करत असताना कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या पती / पत्नीलाविधवा / विधुर पेन्शन मिळण्यासाठीचा अर्ज.<br>3) कामगार कोठेही सेवा / नौकरी करत नसेल पण **पेन्शनस्कीम सर्टिफिकेट** धारक असेल आणि ५८ वय होण्यापूर्वी त्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या पती / पत्नीलाविधवा / विधुरपेन्शन मिळण्यासाठी चा अर्ज. |
| | |
| **पुढील तीन दावे कागदी स्वरूपात स्वीकारण्यात येतात** | |
| **फॉर्म 10(C)** | नौकरी सोडल्यानंतर पेन्शन खाते बंद न करता त्याच्या ऐवजी **पेन्शनस्कीम सर्टिफिकेट**मिळण्यासाठी अर्ज (जेणे करून भविष्या मध्ये कामगार आणि त्याच्या कुटुंबाला मासिक पेन्शनघेता येईल) |
| **फॉर्म 20** | कर्मचारी / कामगाराचा मृत्यु झाल्यास भविष्य निधी खात्यातील संपूर्ण रकममिळण्यासाठी त्याच्या पत्नी / पती / कुटुंबीय / नॉमिनी यांनी करावयाचाअर्ज. |
| **फॉर्म 5(IF)** | कर्मचारी / कामगाराचा नौकरी / सेवेच्या दरम्यान मृत्यु झाल्यास बिमा /इन्शुरन्सची रकम मिळण्यासाठी त्याच्या पत्नी / पती / कुटुंबीय / नॉमिनीयांनी करावयाचा अर्ज. |

# 13. UAN - Universal Account number युनिव्हर्सल अकाउंट नंबर आणि ऑनलाइन अर्ज

**1.** उद्योगामध्ये वारंवार एक नौकरी सोडून दुसरी नौकरी करण्याचे, काम बदलण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्याच बरोबर हंगामी स्वरूपाच्या उद्योगा मध्ये काम करून स्थलांतर करण्याचे प्रमाण सुद्धा जास्त झाले आहे. **EPFO** द्वारे **जानेवारी २०१४** पासून युनिव्हर्सल अकाउंट नंबर **(Universal Account Number - UAN)** सुरु करण्यात आला होता ज्याच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे एकापेक्षा जास्त असणारे भविष्य निधी खाते **(PF** अकाउंट नंबर**)** एकत्रित करण्यात येतात. आता या प्राणाली चा उपयोग ऑनलाइन फॉर्म **19,** फॉर्म **31,** फॉर्म **10C,** फॉर्म **10D,** फॉर्म **13** दाखल करण्यासाठी होत आहे. ऑनलाइन फॉर्म भरण्यासाठी कामगारांना संस्था **/** कंपनी **/** नियोक्ताच्या सहीची गरज पडत नाही, हे दावे सरळ भविष्य निधी कार्यालयाला पोहचतात.

**2.** या साठी कर्मचाऱ्यांना त्यांचे आधार, बैंक अकाउंट, पॅन त्यांच्या UAN नम्बर ला जोडावे / लिंक करावे लागते आणि संस्था / कंपनी / नियोक्ता याना ते डिजिटली अप्रूव्ह / अनुमोदित करावे लागते. सर्व कर्मचाऱ्यांनी, कामगारांनी आपले आधार, बैंक अकाउंटची प्रत व **IFSC** नंबर आपल्या नियोक्ताकड़े **/** कंपनीकड़े **/** संस्थेकड़े जमा करावे, ज्यांच्या जवळ पॅन कार्ड आहे त्यांनी आपले पॅनची प्रत सुद्धा नियोक्ता **/** संस्थेकड़े जमा करावी.

**3.** कर्मचाऱ्यांना आपला **UAN** सक्रिय **(Activate)** करुन घ्यायचा आहे, त्यासाठी कर्मचाऱ्यांना आपला मोबाईल क्रमांक आधार सोबत लिंक करावा लागेल. **UAN** सक्रिय **(Activate)** केल्यानंतर **UAN** आणि **PASSWORD** हा जपून ठेवायचा आहे. कर्मचारी जेव्हा हे चारफॉर्म **-** फॉर्म **19,** फॉर्म **31,** फॉर्म **10C,** फॉर्म **10D** आणि फॉर्म **13 ONLINE** भरतील तेव्हा त्यांच्या आधार लिंकडं मोबाईल वर पासवर्ड येणार.

**4. UAN** आणि आधार मधले नाव आणि जन्म तारीख ही तंतोतंत सारखीच असायला पाहिजे. जर नावा मध्ये **SPELLING MISTAKE** असेल किंवा **INITIAL** असलेले नाव पूर्ण लिहायचे असेल तर अशी दुरुस्ती ऑनलाइन पद्धतिने होऊ शकते. जन्म तारखे मध्ये तफावत असेल तर अशी दुरुस्ती सुद्धा ऑनलाइन पद्धतिनी होऊ शकते. अशी दुरुस्ती**ONLINE** करण्यासाठी भविष्य निधि कार्यालयाने जे संयुक्त विनंती अर्ज **(Joint request)** चे प्रारूप जारी केलेले आहे ते भरून द्यावे लागणार आणि त्या सोबत लागणारे कागदपत्रे नियोक्ता / कंपनी / संस्था द्वारे**upload** करावे लागणार. आधार आणि **UAN** मधले नाव आणि जन्म तारीख तंतोतंत सारखे असल्या शिवाय कर्मचाऱ्यांना **ऑनलाइन फॉर्म** भरता येत नाही, त्यामुळे ही दुरूस्तीची प्रक्रिया पहिले पूर्ण करणे आवश्क आहे.

**5.** ज्या कर्मचाऱ्यांना **/** कामगारांना **UAN** मिळाला आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांची **/** कामगाऱ्यांची सेवेत **/** नौकरी मध्ये रुजु झाल्याची तारीख आणी नौकरी सोडल्याची तारीख त्या संस्था **/** कंपनी **/** नियोक्ताने

